जनमानसाचा निडर आवाज...

# पुणे प्राईम न्यूज

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे




दैनिक | वर्ष १ | अंक २३४ | शुक्रवार, २० मार्च २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210

## संक्षिप्त

### कुंजीरवाडीत तलवारीसह दोन तरुण जेरबंद

**लोणी काळभोर, ता. १९ :** कुंजीरवाडी (ता. हवेली) परिसरात मध्यरात्री संशयास्पद हालचाली करत उभ्या असलेल्या दोन तरुणांना लोणी काळभोर पोलिसांनी तलवारीसह अटक केली आहे. ही कारवाई सोमवारी (ता. १६) मध्यरात्री गस्त घालत असताना करण्यात आली. पोलिसांच्या वेळीच केलेल्या कारवाईमुळे संभाव्य गंभीर गुन्हा टळल्याची चर्चा परिसरात सुरू आहे. रोहित लक्ष्मण गाडे (वय २१, रा. प्रयागधाम रोड, नायगावपेठ, उरुळी कांचन) आणि आदित्य महेश भंडवलकर (वय २०, रा. माळवाडी, कुंजीरवाडी) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. याप्रकरणी पोलीस अंमलदार सचिन सोनवणे यांनी सरकारच्या वतीने लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पोलीस हवालदार अन्ना माने, पोलीस अंमलदार सचिन सोनवणे आणि मयूर बोरावके हे १६ मार्च रोजी रात्री गस्तीवर होते. रात्री सुमारे ९ वाजल्यापासून सुरू असलेल्या पेट्रोलिंगदरम्यान कुंजीरवाडी येथील नव्या कालव्याजवळ दोन संशयित इसम शस्त्रासह उभे असल्याची खात्रीशीर माहिती पोलिसांना खबऱ्यामार्फत मिळाली.

# लोणी काळभोर येथील बंद असलेल्या डी. एड. कॉलेजचा शासनाने योग्य वापर करावा

## शासकीय कार्यालय किंवा नागरी सुविधा केंद्र उभारण्याची नागरिकांची मागणी

**लोणी काळभोर, ता. १९ :** मागील ११ वर्षांपासून लोणी काळभोर (ता. हवेली) येथील पुणे जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे शासकीय शिक्षणशास्त्र पदविका महाविद्यालय (डी. एड. कॉलेज) बंद अवस्थेत असून सध्या धूळ खात पडले आहे. परिसरात दारूच्या बाटल्यांचा खच पडलेला दिसत असून भुरट्या चोरांनी इमारतीचे दरवाजे, कडी-कोयंडे उचकटून चोरी केल्याच्या घटना घडल्या आहेत.

या महाविद्यालयातून तब्बल ६० वर्षांहून अधिक काळ ज्ञानदानासारखे पवित्र कार्य केले जात होते. त्यामुळे शासनाने या ठिकाणी कोणतेही शासकीय कार्यालय अथवा नागरी सुविधा केंद्र उभारून या जागेचा योग्य सदुपयोग करावा; मात्र येथे कचरा डेपो अथवा कचरा प्रक्रिया प्रकल्प उभारू नये, अशी चर्चा सध्या पूर्व हवेली परिसरात रंगत आहे.

लोणी काळभोर येथील शासकीय शिक्षणशास्त्रपदविकामहाविद्यालयाची



स्थापना १९४८ साली करण्यात आली होती. सुमारे साडेसात एकर परिसरात पसरलेल्या या विद्यालयात वसतीगृहे तसेच शिक्षकांसाठी राहण्याची सुसज्ज व्यवस्था करण्यात आली होती. या ज्ञानमंदिरातून अनेक आदर्श आणि सुसंस्कृत पिढ्या घडल्या. मात्र, सन २०१५ मध्ये हे शासकीय महाविद्यालय बंद पडले. त्यानंतर प्रशासनाकडून इमारतीच्या सुरक्षेसाठी कोणतीही सुरक्षारक्षकाची नेमणूक करण्यात आलेली नाही.

पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील कदमवाकवस्ती (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीत, इंडियन ऑईल व एचपी कंपनीच्या मधून जाणाऱ्या रस्त्यापासून सुमारे ५०० मीटर अंतरावर हे महाविद्यालय स्थित आहे. विद्यालय आडबाजूला असल्याने परिसरात भुरट्या चोरांनी आणि मद्यपींनी बस्तान बसवले आहे. वर्गखोल्या, कार्यालये, ग्रंथालय, स्वच्छतागृहे तसेच मैदानात बिअर व दारूच्या बाटल्या पडलेल्या आढळतात. चोरट्यांनी महाविद्यालयातील खोल्यांचे दरवाजे, चौकटी, कडी-कोयंडे, छतावरील पत्रे तसेच हातपंपाचे दांडेही चोरून नेले आहेत. भिंतींवरील महापुरुषांच्या प्रतिमाही धुळीत माखलेल्या अवस्थेत आहेत. त्यामुळे या पवित्र शिक्षणमंदिराची अवस्था सध्या अत्यंत दयनीय झाली आहे.

एकेकाळी या विद्यालयात प्रवेश मिळवण्यासाठी विद्यार्थी आणि पालकांची झुंबड उडत असे. याच वास्तूमध्ये दर्जेदार शिक्षण घेतलेले अनेक विद्यार्थी आज विविध उच्च पदांवर कार्यरत आहेत. काही जण आदर्श शिक्षक म्हणून सेवा बजावत आहेत, तर काही माजी विद्यार्थी प्रामाणिकपणे सेवा पूर्ण करून सन्मानाने सेवानिवृत्त झाले आहेत. मात्र, त्यांना घडवणाऱ्या या विद्यामंदिराचे आज झालेले विद्रूपीकरण पाहून परिसरात खंत व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, या बेसिक सेंटरच्या जागेवर कोणतेही शासकीय कार्यालय किंवा नागरी सुविधा केंद्र उभारण्यात यावे, अशी नागरिकांची मागणी आहे. त्यामुळे सर्वसामान्यांना शासकीय योजना व सेवांचा लाभ मिळेल आणि या ऐतिहासिक वास्तूचे विद्रूपीकरणही थांबेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. तसेच या विद्यालयाशी निगडित अनेकांच्या आठवणीही पुन्हा ताज्या होतील, अशी भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे.

### कचरा डेपो नको रे बाबा!

लोणी काळभोर येथील बंद पडलेल्या शासकीय डी.एड. महाविद्यालयाच्या विस्तीर्ण जागेचा उपयोग नागरिकांसाठी शासकीय कार्यालय, प्रशिक्षण केंद्र किंवा इतर नागरी सुविधांसाठी करावा, अशी सर्वसामान्यांची मागणी आहे.परंतु या ऐतिहासिक आणि शैक्षणिक वारसा असलेल्या परिसरात कचरा डेपो किंवा कचरा प्रक्रिया प्रकल्प उभारण्याच्या चर्चेमुळे नागरिकांमध्ये तीव्रनाराजी व्यक्त होत आहे. ज्ञानमंदिराचा कचरा डेपो होऊ देऊ नका, अशी भावनिक प्रतिक्रिया स्थानिकांकडून व्यक्त होत असून शासनाने या जागेचा सन्मान राखत योग्य निर्णय घ्यावा, अशी मागणी जोर धरत आहे.

### रांजणगाव येथे अंमली पदार्थ तस्करी करणाऱ्या तरुणाला अटक

**पुणे, ता. १९ :** पुणे ग्रामीण पोलिसांनी अमली पदार्थ तस्करीविरोधात मोठी कारवाई करत रांजणगाव एमआयडीसी परिसरात मेफेड्रोन म्हणजेच एमडी ड्रग्जचा साठा उघड केला आहे. स्थानिक गुन्हे शाखा आणि रांजणगाव पोलिसांनी संयुक्त कारवाई करून सुमारे ३४ ग्रॅम वजनाचा आणि अंदाजे ६ लाख ८० हजार रुपये किमतीचा अमली पदार्थ जप्त केला आहे. या कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सोमवारी दि. १६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अविनाश शिळीमकर आणि रांजणगाव पोलीस ठाण्याचे निरीक्षक महादेव वाघमोडे यांचे पथक गस्त घालत होते. यावेळी गणेगाव रोडवरील संकल्प सिटी परिसरात अमली पदार्थांची विक्री होणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. या माहितीनुसार पोलिसांनी तत्काळ सापळा रचून छापा टाकला. या कारवाईत प्रशांत फक्कड मावळे (वय २४, रा. रांजणगाव, मूळ रा. मलठण, ता. शिरूर) याला ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडून ३४ ग्रॅम एमडी ड्रग्जसह इलेक्ट्रिक वजन काटा आणि स्टील प्लेट असा एकूण सुमारे ६८०००० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी आरोपीविरुद्ध एनडीपीएस कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# मुंबई–पुणे–हैदराबाद बुलेट ट्रेनला हिरवा कंदील; रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णवांची घोषणा

**मुंबई, ता. १९ :** महाराष्ट्रातील रेल्वे प्रवाशांसाठी केंद्र सरकारकडून मोठी आनंदाची बातमी समोर आली आहे. मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पानंतर आता राज्यात आणखी २ हाय-स्पीड बुलेट ट्रेन मार्ग विकसित करण्याची तयारी सुरू आहे. यामध्ये मुंबई-पुणे आणि पुणे-हैदराबाद या मार्गांना प्राधान्य देण्यात आले आहे. रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी संसदेत ही माहिती दिली.

या नव्या प्रकल्पामुळे प्रवासाचा वेळ मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे. नियोजनानुसार मुंबई ते पुणे हे अंतर केवळ ४८ मिनिटांत पूर्ण होऊ शकते. सध्या याच प्रवासासाठी सुमारे ३ ते ४ तास लागतात. तसेच पुणे ते हैदराबाद हा प्रवास अंदाजे २ तासांत पूर्ण होईल, असे सांगितले जात आहे. या बदलामुळे आयटी



आणि औद्योगिक क्षेत्राला मोठी मदत मिळणार आहे.

दरम्यान, मुंबई उपनगरीय रेल्वे व्यवस्थेसाठीही मोठ्या प्रमाणात निधी देण्यात आला आहे. सुमारे ३००० कोटी रुपयांचे अनुदान देण्यात आले असून २३८ नवीन स्वयंचलित दरवाजे असलेल्या गाड्यांची निर्मिती सुरू आहे. यामुळे प्रवाशांच्या सुरक्षिततेत आणि सोयींमध्ये वाढ होणार आहे.

राज्यात मुंबई ते नागपूर बुलेट ट्रेनची मागणीही अनेक दिवसांपासून होत आहे. मात्र सध्या पुणे-मुंबई आणि पुणे-हैदराबाद या मार्गांना प्राधान्य दिल्यामुळे विदर्भातील प्रवाशांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे. नागपूर मार्गाबाबत स्पष्टता कधी मिळणार, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

याचबरोबर देशातील पहिल्या समुद्राखालील सुमारे २१ किलो मीटर लांबीच्या बोगद्याचे काम वेगाने सुरू आहे. तसेच १७ नद्यांवरील पुलांचे कामही प्रगतीपथावर आहे. यापैकी ७ पैकी ५ किलोमीटर बोगद्याचे काम पूर्ण झाले आहे. हे प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर रेल्वे प्रवास अधिक वेगवान आणि आधुनिक होणार आहे.

# लोणी काळभोर येथील आरोही वाघमारे व वेदिका कराडची ऑलिम्पियाड परीक्षेत यश

लोणी काळभोर, ता. १९ : श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था संचलित लोणी काळभोर (ता. हवेली) येथील इंग्लिश मीडियम स्कूलमधील विद्यार्थ्यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावरील ऑलिम्पियाड परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत शाळेचा शैक्षणिक मान उंचावला आहे. भारतासह परदेशातील विद्यार्थ्यांशी स्पर्धा करत या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी केली असून लोणी काळभोरच्या शैक्षणिक परंपरेत आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे.

शाळेच्या इयत्ता दुसरीतील आरोही कुंडलिक वाघमारे आणि इयत्ता तिसरीतील वेदिका शेषेराव कराड या विद्यार्थिनींनी आपल्या गटात प्रथम क्रमांक मिळवत शाळेचे नाव उज्ज्वल केले. त्यांच्या या यशाबद्दल दोन्ही विद्यार्थिनींना कॅश



प्राईज, गोल्ड मेडल आणि प्रमाणपत्र देऊन लवकरच सन्मानित करण्यात येणार आहे.

या स्पर्धेत शाळेच्या एकूण ५४ विद्यार्थ्यांनी गोल्ड मेडल, २१ विद्यार्थ्यांनी सिल्वर मेडल तर २७ विद्यार्थ्यांनी ब्राँझ मेडल मिळवत शाळेचा लौकिक वाढवला. विद्यार्थ्यांच्या या कामगिरीमुळे पालक, शिक्षक आणि परिसरात अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे. दरम्यान, ऑलिम्पियाड सारख्या स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांमध्ये विश्लेषणात्मक विचारशक्ती, स्पर्धात्मकता आणि जागतिक स्तरावर स्वतःची क्षमता सिद्ध करण्याची जिद्द विकसित होते. इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी मिळवलेले हे यश इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरणार असल्याची भावना पालक व शिक्षकांनी व्यक्त केली.

विद्यार्थ्यांना या यशापर्यंत पोहोचविण्यात मोलाची भूमिका बजावणाऱ्या शिक्षिका अंजली कवडे आणि दिपाली शेलार यांच्यासह सर्व विषय शिक्षकांचे संस्थेकडून विशेष अभिनंदन करण्यात आले. तसेच संस्थेचे सहसचिव प्रशासन एस. एम. गवळी, शाळेच्या प्राचार्या पौर्णिमा शेवाळे, तसेच इन्चार्ज व सर्व समन्वयक यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनीही विद्यार्थ्यांच्या परिश्रमांचे आणि जिद्दीचे अभिनंदन करत त्यांच्या यशाबद्दल आनंद व्यक्त केला.

## धोनीचा 'नंबर ७' ला निरोप? आता 'नंबर ८' च्या जर्सीत दिसणार

**पुणे, ता. १९ :** इंडियन प्रीमियर लीग २०२६ चा हंगाम २८ मार्चपासून सुरू होणार असून ३१ मे रोजी अंतिम सामना खेळवला जाणार आहे. १९ व्या हंगामात १० संघ आणि सुमारे ८४ सामने असणार असल्याने चाहत्यांमध्ये आधीपासूनच उत्साह आहे. मात्र स्पर्धा सुरू होण्याआधीच चेन्नई सुपर किंग्स आणि महेंद्रसिंग धोनी यांच्याभोवती एक वेगळीच चर्चा रंगली आहेती म्हणजे त्याच्या जर्सी क्रमांकाबाबत.

दीर्घकाळ नंबर ७ शी जोडला गेलेला धोनी आता नंबर ८ची जर्सी परिधान करू शकतो, अशी शक्यता त्याने स्वतः सोशल मीडियावर शेअर केलेल्या व्हिडिओमुळे निर्माण झाली आहे. त्या व्हिडिओमध्ये ७ क्रमांकाची जर्सी बाजूला ठेवून ८ क्रमांकाची जर्सी घेतल्याचं दिसतं. काही क्रमांक आयुष्यभर सोबत राहतात पण आज मी ८ निवडतोय, यामागचं कारण लवकरच समजेल, असं सूचक विधान धोनीने केलं आहे. धोनी आणि ७ हा क्रमांक




हे समीकरण केवळ आयपीएलपुरतं मर्यादित नाही. त्याचा जन्म ७ जुलै १९८१ रोजी झाल्यामुळे त्याने हा क्रमांक स्वीकारला आणि तो त्याची ओळखच बनला. इतकंच नाही, बीसीसीआयने त्याच्या योगदानाचा सन्मान म्हणून नंबर ७ जर्सी निवृत्त केल्याची माहितीही समोर आली होती. त्यामुळे हा बदल केवळ साधा निर्णय नसून, त्यामागे काही मोठा विचार असल्याची चर्चा आहे. काही क्रिकेट तज्ज्ञांच्या मते, हा बदल ब्रँडिंग आणि मार्केटिंगच्या दृष्टीनेही महत्त्वाचा असू शकतो. आयपीएलसारख्या मोठ्या व्यासपीठावर अशा बदलां मुळे चाहत्यांमध्ये उत्सुकता निर्माण होते आणि मर्चंडाइज विक्रीलाही चालना मिळते.

# सर्वसामान्यांच्या घराच्या स्वप्नाला पंख : महालक्ष्मी डेव्हलपर्सची १९ वर्षांची विश्वासार्ह वाटचाल

**लोणी काळभोर, ता. १९ :** पुणे शहराच्या आसपास परवडणाऱ्या दरात जमीन उपलब्ध करून देत हजारो कुटुंबांच्या घराच्या स्वप्नांना आकार देणारी महालक्ष्मी ग्रुपच्या वतीने 'महालक्ष्मी डेव्हलपर्स ही संस्था गेल्या १९ वर्षांपासून यशस्वीपणे कार्यरत असून रिअल इस्टेट क्षेत्रात विश्वासाचे प्रतीक बनली आहे.

या व्यवसायाचे नेतृत्व दत्तात्रय गोते- पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली होत असून, सर्वसामान्य माणसालाही स्वतःचे हक्काचे घर मिळावे हा या व्यवसायामागील मुख्य उद्देश आहे. प्रामाणिकपणा, पारदर्शक व्यवहार आणि ग्राहकांप्रती असलेली बांधिलकी या मूल्यांमुळे महालक्ष्मी डेव्हलपर्सने आजपर्यंत लाखो समाधानी ग्राहकांचा विश्वास संपादन केला आहे.

महालक्ष्मी डेव्हलपर्सच्या माध्यमातून पुणे शहरालगत वेगाने विकसित होत असलेल्या अनेक भागांमध्ये प्लॉटिंग प्रकल्प राबविण्यात येत आहेत. पेरणे फाटा, वडकी, उरुळी कांचन, वाघोली, जेजुरी, लोणी काळभोर, भिवरी, शिवरी, थेऊर, केसनंद, रांजनगाव आणि शिक्रापूर या परिसरांमध्ये निवासी तसेच व्यावसायिक वापरासाठी योग्य अशा प्लॉटची उपलब्धता करून देण्यात येत आहे. यामुळे गुंतवणूकदार आणि घर बांधण्याची इच्छा असलेल्या नागरिकांना मोठा फायदा होत आहे.




ग्राहकांच्या सोयीसाठी सर्व प्रकल्पांमध्ये उत्तम नियोजन, आवश्यक सोयीसुविधा आणि स्पष्ट कागदपत्रे यावर विशेष भर दिला जातो. त्यामुळे व्यवहारातील पारदर्शकता आणि विश्वासार्हता हीच महालक्ष्मी डेव्हलपर्सची ओळख बनली आहे. महालक्ष्मी ग्रुपने केवळ प्लॉटिंग व्यवसायापुरते मर्यादित न राहता 'महालक्ष्मी एव्हिएशन' या नावाने हेलिकॉप्टर सेवा क्षेत्रातही उल्लेखनीय कामगिरी केली आहे. या दोन वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये यशस्वीपणे कार्य करत महालक्ष्मी ग्रुपने उद्योगविश्वात आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे.

दरम्यान, गेल्या दोन दशकांच्या जवळपासच्या वाटचालीत महालक्ष्मी डेव्हलपर्सने पारदर्शकता, विश्वास आणि गुणवत्तेच्या जोरावर रिअल इस्टेट क्षेत्रात मजबूत पाय रोवले असून, येत्या काळातही सर्वसामान्यांच्या घराच्या स्वप्नांना आकार देण्याची त्यांची धडपड अशीच सुरू राहणार आहे. अधिक माहितीसाठी इच्छुक ग्राहकांनी महालक्ष्मी ग्रुपच्या कार्यालयाला प्रत्यक्ष भेट द्यावी, असे आवाहन कंपनीच्या वतीने करण्यात आले आहे. कार्यालयाचा पत्ता ऑफिस क्र. १११, ॲपेक्स टॉवर, अमनोरा मॉल, हडपसर, पुणे ४११०२८ असा असून अधिक माहितीसाठी ९३७१४७५१५० या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

> ग्राहकांचा विश्वास, दर्जेदार सेवा आणि पारदर्शक व्यवहार या तत्त्वांवर आमचा व्यवसाय उभा आहे. भविष्यातही अधिकाधिक लोकांना स्वतःच्या नावाची जमीन मिळावी आणि त्यांचे घर व व्यवसायाचे स्वप्न पूर्ण व्हावे, यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील राहणार आहोत.
> - **शरद गोते-पाटील,** संचालक, महालक्ष्मी डेव्हलपर्स

> आम्ही अनेक ठिकाणी प्लॉट पाहिले; परंतु महालक्ष्मी डेव्हलपर्सकडे गेल्यानंतरच आम्हाला प्लॉट घ्यावा असे वाटले. पारदर्शक व्यवहार, कागदपत्रांची पूर्तता आणि एकाच ठिकाणी विविध पर्याय उपलब्ध असल्याने निर्णय घेणे सोपे झाले. आज महालक्ष्मी डेव्हलपर्स हा विश्वासू ब्रँड बनला आहे.
> - **मधुकर खैरे,** ग्राहक

## संक्षिप्त



### बोरघाटात कंटेनर कारवर कोसळला; तीन ठार, सहा वाहने चिरडली

**पुणे, ता. १९ :** मुंबई-पुणे एक्प्रेस वेवर आज भीषण अपघात झाला. बोर घाटात सकाळी १० वाजता एका कंटेनरने सहा वाहनांना जोरदार धडक दिली. यानंतर कंटेनर एका कारवर कोसळला. या भीषण अपघातात इनोव्हा कारमधील तिघांचा जागीच मृत्यू झाला, तर पाच जण गंभीर जखमी आहेत. अपघातामुळे बोरघाटातील वाहतूक दोन तास विस्कळीत झाली होती. चालक अवधेश यादव हा पंटेनर घेऊन पुण्याहून मुंबईकडे जात होता. तो बोर घाटातील खोपोली एक्झिटजवळ आला असता पंटेनरवरील नियंत्रण सुटल्याने त्याने समोरील एका कारला जोरदार धडक दिली. यानंतर आणखी चार वाहनांना धडक देत पंटेनर पुढे जाऊन इनोव्हा कारवर आदळला. या अपघातात इनोव्हा कारमधील श्रीकांत जाधव, अंबादास पेटारे, प्रमोद पवार (सर्व रा. पुणे) या तीन जणांचा जागीच मृत्यू झाला.

### रॅपिडो चालकाने इंजिनिअरचे बोट चावून तोडले

**पुणे, ता. १९ :** पुण्यातून एक संतापजनक आणि क्रूर घटना समोर आली आहे. हिंजवडी आयटी पार्कमध्ये काम करणाऱ्या एका ४२ वर्षीय इंजिनिअरला कॅब चालकाने जोरात चावले. केवळ पवरील भाड्यापेक्षा जास्त पैसे देण्यास नकार दिला म्हणून, संतापलेल्या कॅब चालकाने इंजिनिअरच्या डाव्या हाताचे बोट चक्क तोंडात धरून चावून तोडले. या भीषण हल्ल्यात इंजिनिअरच्या बोटाचा वरचा भाग शरीरापासून वेगळा झाला आहे. सोमवारी आपली शिफ्ट संपवून नाना पेठ येथे घरी जाण्यासाठी 'रॅपिडो' पवरून कॅब बुक केली होती. कॅब चालक आल्यावर त्याने पवर दिसणाऱ्या ठराविक भाड्याऐवजी 'मीटर'प्रमाणे जादा पैसे देण्याचा हट्ट धरला. इंजिनिअरने जादा पैसे देण्यास नकार दिल्यावर दोघांमध्ये शाब्दिक चकमक उडाली. हा वाद इतका विकोपाला गेला की, प्रवासाला सुरुवात होण्यापूर्वीच चालकाने इंजिनिअरवर हल्ला केला आणि रागाच्या भरात त्यांचे बोट तोंडात घेऊन जोरात चावा घेतला. या भीषण हल्ल्यानंतर जखमी इंजिनिअरला तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले, जिथे त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

### फुरसुंगीत विवाहबाह्य संबंधांतून पत्नीला मारहाण करून जीवे मारण्याची धमकी

**फुरसुंगी, ता. १९ :** विवाहबाह्य संबंधांच्या वादातून पत्नीला पतीने बेदम मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी पत्नीने पतीच्या विरोधात फुरसुंगी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. संतोष पोपट थोरात, वय-३६ वर्ष, धंदा व्यवसाय, रा. भेकराईनगर, फरसंगी) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या पतीचे नाव आहे. याप्रकरणी पत्नीने दिलेल्या तक्रारीनुसार पतीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी यांचा विवाह २०१९ मध्ये संतोष थोरात यांच्याशी झाला होता. २०२५ पर्यंत संसार सुरळीत सुरू असताना, जून महिन्यात प्रियांका यांनी पतीचा मोबाईल तपासला. त्यामध्ये एका मुली सोबतचे चॅटिंग आणि फोटो पाहिले. याबाबत जाब विचारला असता, संतोष याने ती आपली मैत्रीण असून तिच्याशी लग्न करणार असल्याचे सांगितले.

# कोंढणपूरमध्ये घरात घुसून मारहाण; १४ हून अधिक जणांवर गुन्हा

विशाल शिंदे

हवेली, ता. १९ : हवेली तालुक्यातील कोंढणपूर येथे घरात घुसून मारहाण व तोडफोड केल्याची गंभीर घटना घडली असून या प्रकरणी राजगड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी नवनाथ जनार्धन पवार (वय ३०, व्यवसाय रिक्षा चालक, रा. कोंढणपूर, ता. हवेली, जि. पुणे) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून हा गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दिनांक १७ मार्च २०२६ रोजी दुपारी सुमारास वेळू येथे फिर्यादींच्या चुलत्यांच्या दशक्रिया



विधीवेळी काही कारणावरून वाद झाला होता. या वादाचा राग मनात धरून आरोपी करण प्रकाश चव्हाण याने फिर्यादीच्या भावाला फोनवरून धमकी देत नवनाथला आमच्याकडे घेऊन ये, नाहीतर आम्ही येऊन त्याला मारून टाकू, अशी धमकी दिली होती.

यानंतर त्याच दिवशी रात्री सुमारे ९.३० वाजता आरोपी १) प्रकाश चव्हाण (पूर्ण नाव माहिती नाही), २) नंदा प्रकाश चव्हाण, ३) करण प्रकाश चव्हाण, ४) मयूर प्रकाश चव्हाण (सर्व रा. कात्रज, पुणे) तसेच प्रकाश चव्हाण याचा भाचा (नाव व पत्ता अज्ञात) आणि त्यांच्यासोबत इतर ८ ते ९ अनोळखी इसमांनी बेकायदेशीर जमाव करून फिर्यादीच्या घरात घुसखोरी केली.

आरोपींनी हातात कोयते, काठ्या व लोखंडी रॉड घेऊन घरातील साहित्याची तोडफोड केली. तसेच घराबाहेर उभी असलेली मोटारसायकलही तोडण्यात आली. यावेळी अनिल पवार यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यात आली असून शिवीगाळ व दमदाटीही करण्यात आली असल्याचे फिर्यादीत नमूद आहे. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून संबंधित आरोपींवर कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे. पुढील तपास राजगड पोलीस स्टेशन करत आहे.

### गंगा नदीत इफ्तार पार्टी; १४ अटकेत

**वाराणसी, ता. १९ :** उत्तर प्रदेशातील वाराणसी येथे गंगा नदीपात्रात होडीत बसून इफ्तार पार्टी केल्याप्रकरणी १४ तरुणांना पोलिसांनी अटक केली आहे. या कारवाईमुळे राजकीय वाद निर्माण झाला आहे. इफ्तार पार्टी करणाऱ्या तरुणांनी नेमका कोणता कायदा मोडला, असा सवाल काँग्रेसने केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सोमवारी सायंकाळी काही तरुणांनी गंगा घाटावर इफ्तार पार्टीचे आयोजन केले होते. पार्टीसाठी काही तरुण अस्सी घाटावर एकत्र जमले. तिथे एका मोठ्या होडीत बसून त्यांनी नमो घाटापर्यंत प्रवास केला. त्यांनी होडीवर नमाज पठण केले व नंतर फलाहार केला. या पार्टीचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यामुळे वाद झाला. संबंधित तरुणांनी चिकनचे तुकडे गंगेत टाकल्याचा आरोप भाजपच्या स्थानिक नेत्यांनी केला आहे. या तरुणांनी पोलिसांच्या हातावर ईदी (भेट) ठेवली नसेल म्हणून ही कारवाई झाली असेल, असा टोला समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव यांनी हाणला.

# अशोक खरातच्या काळ्या कारनाम्यांवर पडदा उघडणार; तेजस्वी सातपुते तपासात सक्रिय

**नाशिक, ता. १९ :** स्वतःला अंकशास्त्रज्ञ, ज्योतिष म्हणवून घेणारा आणि राजकीय वर्तुळात वावरणारा कॅप्टन अशोक खरात याला बलात्काराच्या गंभीर आरोपांखाली अटक करण्यात आली आहे. या अटकेनंतर नाशिकसह संपूर्ण महाराष्ट्रात एकच खळबळ उडाली असून, आध्यात्मिक शक्तीच्या नावाखाली महिलांचे शोषण करण्याचे एक मोठे रॅकेट उघडकीस येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

अशोक खरात हा मंत्रतंत्र, अंकशास्त्र आणि दैवी शक्तीचा दावा करून महिलांना जाळ्यात ओढत असे. अडचण निवारण्याच्या बहाण्याने महिलांचा विश्वास संपादन करून त्यांच्यावर शारीरिक अत्याचार



केल्याचे आरोप त्याच्यावर आहेत. गुन्हे शाखेच्या युनिट १ ने बुधवारी पहाटे ही कारवाई केली. न्यायालयाने खरातला २४ मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

खरातच्या कॅनडा कॉर्नर येथील कार्यालयाची झडती घेतली असता, पोलिसांच्या हाती एक महत्त्वाचा 'पेन ड्राईव्ह' लागला आहे. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, या पेन ड्राईव्हमध्ये तब्बल ५८ व्हिडिओ आढळले आहेत. हे व्हिडिओ पीडित महिलांचे असण्याची शक्यता असून, त्याआधारे खरात ब्लॅकमेलिंग करत होता का, याचा तपास आता पोलीस करत आहेत. या व्हिडिओंच्या माध्यमातून अनेक बड्या नावांचे धागेदोरे समोर येण्याची भीती व्यक्त होत आहे.

याप्रकरणाने आता राजकीय वळण घेतले आहे. राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी खरातची पूजा केल्याचा एक जुना फोटो समोर आल्याने विरोधकांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. या प्रकरणाची व्याप्ती आणि गांभीर्य लक्षात घेऊन राज्य सरकारने एसआयटी स्थापन केली आहे. आयपीएस अधिकारी तेजस्वी सातपुते यांच्याकडे या तपासाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. सातपुते यांची यापूर्वीची कामगिरी पाहता, या प्रकरणातील पीडितांना न्याय मिळेल, अशी आशा व्यक्त होत आहे.

### चऱ्होली येथे व्यापाऱ्यावर जीवघेणा हल्ला, तिघांविरुद्ध गुन्हा

**पिंपरी-चिंचवड, ता. १९ :** किरकोळ कारणावरून वाद होऊन त्याचे रूपांतर थेट जीवघेण्या हल्ल्यात झाल्याची घटना चऱ्होली परिसरात घडली आहे. कुंडी खरेदीच्या दरावरून झालेल्या वादातून तिघांनी मिळून एका व्यापाऱ्यावर हल्ला केला. या घटनेत व्यापारी गंभीर जखमी झाला असून परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, राजेश चिमाजी वामन (वय ४५, रा. चऱ्होली बु.) हे कुंड्या विक्रीचा व्यवसाय करतात. मंगळवारी सायंकाळी सुमारे ५.३० वाजण्याच्या सुमारास ऋषिकेश विठ्ठल तापकीर (वय २५, रा. वडमुखवाडी) हा त्याच्या दोन साथीदारांसह त्यांच्या दुकानात आला. कुंडीच्या किमतीवरून त्यांच्यात वाद सुरू झाला. आरोपींना कमी दरात कुंडी हवी होती, मात्र व्यापाऱ्याने नकार दिल्यानंतर वाद वाढला.

यानंतर आरोपींनी संतापून राजेश वामन यांना शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. एवढ्यावरच न थांबता त्यांनी दुकानातील एक जड कुंडी उचलून वामन यांच्या डोक्यात मारली. या हल्ल्यात त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली आणि ते जागीच रक्ताच्या थारोळ्यात पडले.

घटनेनंतर जखमी व्यापाऱ्याला तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. याप्रकरणी राजेश वामन यांनी दिघी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी ऋषिकेश तापकीर आणि त्याच्या दोन अज्ञात साथीदारांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. सध्या या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक स्तरावर सुरू असून फरार आरोपींचा शोध घेतला जात आहे. किरकोळ कारणावरून झालेल्या या गंभीर हल्ल्यामुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

# फ्री टीव्ही चॅनेलच्या नावाखाली सायबर चोरट्याने हवालदाराला घातला गंडा

**पुणे, ता. १९ :** सायबर फसवणुकीचे प्रकार दिवसेंदिवस वाढत असून आता सरकारी यंत्रणेतील व्यक्तीदेखील यापासून सुरक्षित राहिलेल्या नाहीत. फ्री टीव्ही चॅनेल पाहण्याच्या आमिषाला बळी पडून पुण्यातील एका ४४ वर्षीय पोलीस हवालदाराची ७१००० रुपयांची फसवणूक झाल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणामुळे सायबर गुन्हेगारांच्या नव्या पद्धतीबाबत चिंता व्यक्त केली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मुंढवा परिसरात राहणारे संबंधित हवालदार ११ डिसेंबर रोजी आपल्या दुचाकीवरून घरी जात असताना त्यांच्या इन्स्टाग्रामवर अँड्रॉइड टीव्हीवर सर्व चॅनेल्स फ्री पाहा अशी जाहिरात दिसली. उत्सुकतेपोटी




त्यांनी त्या लिंकवर क्लिक केले. लिंक उघडताच त्यांचा मोबाईल अचानक हँग झाला. त्यांनी फोन बंद करून पुन्हा सुरू केला, त्यानंतर सर्व काही सुरळीत असल्याचे दिसले.

मात्र दुसऱ्या दिवशी १२ डिसेंबर रोजी ते खरेदीसाठी डी-मार्टमध्ये गेले असताना त्यांना धक्का बसला. बिल भरण्यासाठी गुगल पे उघडल्यावर त्यांच्या खात्यातून ४१००० आणि ३०००० असे एकूण ७१००० रुपये वजा झाल्याचे दिसून आले. ही रक्कम यशराज बैरागी नावाच्या व्यक्तीच्या खात्यात जमा झाल्याचे समोर आले.

या प्रकरणी कोरेगाव पार्क पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. सायबर कक्षाच्या तपासात संबंधित व्यवहार मध्य प्रदेशातील शाजापूर येथील खात्यावर झाल्याचे निष्पन्न झाले आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजयराज डोके या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

या घटनेच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी नागरिकांना अज्ञात लिंकवर क्लिक न करण्याचे आवाहन केले आहे. सोशल मीडियावरील आकर्षक जाहिरातींच्या आहारी न जाता सतर्क राहणे गरजेचे असल्याचेही सांगण्यात आले आहे.

# पुण्यात अवकाळी पावसाची जोरदार बॅटिंग; हातातोंडाशी आलेला घास हिरावला

**पुणे, ता. १९ :** राज्यातील विविध भागांत अवकाळी पाऊस आणि गारपीट झाल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाड्यात बुधवारी अचानक पावसाच्या सरी कोसळल्या. काही ठिकाणी गारपीटही झाली. त्यामुळे ज्वारीसह इतर पिकांवर परिणाम झाला असून शेतकरी अडचणीत आले आहेत.

सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्यातील घोळसगाव परिसरात कापणीच्या तोंडाशी आलेली पिके पावसामुळे आडवी पडली आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. गुढी पाडव्याच्या सणाआधीच आलेल्या या संकटामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंता वाढली आहे.



मोठ्या अपेक्षेने घेतलेले पीक वाया गेल्याने आर्थिक अडचणी निर्माण झाल्या आहेत.

दरम्यान, धाराशिवचे आमदार कैलास पाटील आणि उमरगा-लोहारा मतदारसंघाचे आमदार प्रविण स्वामी यांनी कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांची भेट घेऊन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत देण्याची मागणी केली आहे. मंगळवारी झालेल्या वादळी वारे, पाऊस आणि गारपीट यामुळे अनेक भागांत शेतीचे नुकसान झाले आहे.

पुणे-कोल्हापूर महामार्ग परिसर आणि आंबेगाव तालुक्यातही पावसाच्या सरी पडल्या. डिंभे धरण परिसरात दुपारनंतर वातावरणात बदल होऊन पावसाला सुरुवात झाली. गेल्या काही दिवसांपासून उकाडा वाढला होता. सध्या हलका पाऊस पडत असला तरी पुढील काळात जोरदार पावसाची शक्यता व्यक्त केली जात आहे.

या अवकाळी पावसामुळे द्राक्ष, केळी, आंबा तसेच कांदा, हरभरा, गहू आणि ज्वारी या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी उभी पिके जमिनीवर पडली आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना तातडीने मदतीची गरज आहे.

दरम्यान, कोकणातील आंबा आणि काजू उत्पादक शेतकऱ्यांच्या नुकसानीची दखल राज्य सरकारने घेतली आहे. नुकसानभरपाईबाबत लवकरच निर्णय घेण्यात येईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे.

# लोणावळ्याजवळ झालेल्या अपघातात तीन विद्यार्थ्यांचा मृत्य

**पुणे, ता. १९ :** मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवर गुढीपाडव्याच्या दिवशी घडलेल्या भीषण अपघाताने पुन्हा एकदा या महामार्गाच्या सुरक्षिततेवर प्रश्नचिन्ह उभे केले आहे. लोणावळ्याजवळ गुरुवारी सकाळी झालेल्या या अपघातात आयआयटी मुंबईतील तीन विद्यार्थ्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. सलग दुसऱ्या दिवशी झालेल्या अपघातामुळे केवळ दोन दिवसांत सहा जणांचा बळी गेल्याने डेथ ट्रॅपची भीती पुन्हा अधोरेखित झाली आहे.

मृतांमध्ये ओमकुमार बोरसे (२३), लय भारत (२२) आणि श्रेयांश शर्मा यांचा समावेश आहे. हे तिघेही पवई येथील आयआयटी मुंबईमध्ये शिक्षण घेत होते. मिळालेल्या माहितीनुसार, हे विद्यार्थी सुट्टीचा आनंद घेण्यासाठी लोणावळा येथे गेले होते. गुढीपाडव्याच्या दिवशी पहाटे ते



पुन्हा मुंबईकडे परतत असताना हा अपघात घडला.

प्राथमिक तपासानुसार, एक्सप्रेसवेवर वेगाने वाहन चालवताना आणि ओव्हरटेक करण्याच्या प्रयत्नात त्यांची पोलो कार नियंत्रणाबाहेर जाऊन पलटी झाली. अपघात इतका भीषण होता की तिघेही कारमध्ये अडकले आणि त्यांचा जागीच मृत्यू झाला.


मुंबई-पुणे एक्सप्रेसवे हा राज्यातील सर्वात व्यस्त आणि महत्त्वाचा मार्ग असून, येथे वारंवार होणारे अपघात चिंतेचा विषय ठरत आहेत. वेगमर्यादा न पाळणे, बेफाम ड्रायव्हिंग आणि रेसिंगची प्रवृत्ती हे अपघातांचे प्रमुख कारण मानले जात आहे. या अपघातामुळे मृत विद्यार्थ्यांच्या कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून शैक्षणिक वर्तुळातही हळहळ व्यक्त केली जात आहे.

# रुपाली चाकणकरांनी राजीनामा द्यावा अन्यथा मुख्यमंत्र्यांनी बडतर्फ करावे

## माजी खासदार संभाजीराजे छत्रपती आक्रमक

**नाशिक, ता. १९ :** नाशिक मधील कथित अंकशास्त्रज्ञ अशोक खरात प्रकरणाने आता राज्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडवली आहे. महिलांवर अत्याचाराच्या गंभीर आरोपांवरून अटक झालेल्या या प्रकरणाला आता थेट राजकीय रंग चढला असून राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

अशोक खरातने धार्मिक श्रद्धा, दैवी शक्ती आणि भविष्य सांगण्याच्या नावाखाली महिलांचा विश्वास संपादन करून त्यांचे शोषण केल्याचा





आरोप आहे. मात्र या प्रकरणात वाद अधिक वाढण्याचे कारण म्हणजे चाकणकर यांनी खरातची पाद्यपूजा केल्याचा फोटो समोर आल्याने त्यांच्या राजीनाम्याची मागणी जोर धरू लागली आहे. या मुद्द्यावर राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या रूपाली पाटील ठोंबरे यांनीही तीव्र भूमिका घेतली आहे.

या प्रकरणावर आता माजी खासदार संभाजीराजे छत्रपती यांनी संतप्त प्रतिक्रिया दिली आहे. त्यांनी स्पष्ट शब्दांत म्हटले की, छत्रपती शिवाजी महाराज, शाहू, फुले, आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा असलेल्या महाराष्ट्रात असे प्रकार घडणे अत्यंत निंदनीय आहे. महिला आयोगाच्या प्रमुखांचा अशा प्रकरणाशी संबंध असल्याची चर्चा असेल, तर त्यांनी नैतिकदृष्ट्या राजीनामा द्यायला हवा. अन्यथा मुख्यमंत्र्यांनी तातडीने त्यांचा राजीनामा घ्यावा किंवा त्यांना पदावरून हटवावे, अशी ठाम मागणी त्यांनी केली.

संभाजीराजे यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची गरजही अधोरेखित केली. या मागे नेमकं कोण आहे, कोण-कोण त्या ठिकाणी जात होतं, हे सर्व उघड झाले पाहिजे. अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी कठोर कारवाई आवश्यक आहे, असे ते म्हणाले. महिलांच्या सुरक्षिततेचा मुद्दा अत्यंत गंभीर असल्याचे सांगत त्यांनी प्रशासनाने कडक पावले उचलण्याचे आवाहन केले.

# केंद्रात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेसेनेला दोन मंत्रीपदं मिळणार?

**मुंबई, ता. १९ :** नुकत्याच १० राज्यातील ३७ जागांसाठी राज्यसभा निवडणुका पार पडल्या. यामध्ये महाराष्ट्रातील सात खासदारांचा समावेश आहे. या निवडणुकीनंतर राज्याच्या राजकारणात मोठी घडामोड घडण्याची शक्यता आहे. केंद्रीय मंत्रिमंडळात मोठे फेरबदल होऊ शकतात, अशी दाट शक्यता वर्तवली जात आहे.



सूत्रांच्या माहितीनुसार, एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेला केंद्रात २ मंत्रीपदे मिळणार असल्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर एकनाथ शिंदेंकडून पक्षाची ताकद आणि खासदारांचा आकडा वाढवण्यासाठी उद्धव ठाकरेंच्या खासदारांशी संपर्क साधला जात असल्याची माहिती सूत्रांची आहे. जास्तीत जास्त खासदारांना सोबत घेऊन केंद्रात वजन वाढवण्याचा शिंदेसेनेचा हा प्रयत्न असल्याचे बोलले जात आहे. त्यादृष्टीने ऑपरेशन टायगर राबविण्याची तयारी पक्षाकडून सुरू असून हालचालींना वेग आला आहे.

केंद्र सरकारमध्ये दोन मंत्रीपदं मिळणार असल्याची शक्यता असून त्यामुळे शिवसेना नेत्यांनी आतापासूनच लॉबिंग सुरू केले आहे. असे असले तरी प्रामुख्याने खासदार डॉ. श्रीकांत शिंदे आणि खासदार श्रीरंग बारणे यांची नावे मंत्रिपदासाठी चर्चेत आहेत. केंद्रीय मंत्रिमंडळात फेरबदल झाल्यास काही मंत्र्यांचा पत्ता कट होऊ शकतो, तर काही खासदारांना मंत्रिपदाची संधी मिळू शकते, असा अंदाज वर्तवला जात आहे. मात्र, याबाबत अधिकृत कोणतीही माहिती अद्याप समोर आलेली नाही.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नुकतीच दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली होती. या भेटीदरम्यान ठाकरे गटाचे किती खासदार संपर्कात आहेत आणि पुढील राजकीय रणनीती काय असेल, यावर चर्चा झाल्याचे समजते. यावेळी शिंदेंसोबत खासदार डॉ. श्रीकांत शिंदेंसह काही खासदार देखील उपस्थित होते. त्यामुळे केंद्रात मंत्रीपद मिळण्याच्या चर्चांना उधाण आले आहे.

# अभियंत्याला २५ लाखांचा गंडा घालणारे मामा-भाचे पसार; दोघांवर गुन्हा दाखल

**फुरसुंगी, ता. १९ :** जादा परताव्याचे आमिष दाखवून आणि चक्क बँकांमधून कर्ज काढून गुंतवणूक करण्यास भाग पाडून एका अभियंत्याची २५ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार फुरसुंगी येथे उघडकीस आला आहे. याप्रकरणी दोघांवर फुरसुंगी पोलीस ठाण्यात दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




निलेश सुभाष केदार, (वय ३९ वर्षे, धंदा नोकरी, रा. मॅजेस्टीक नेस्ट, बी-विंग, रुम नं ८०२, फुरसुंगी असे फसवणूक झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. याप्रकरणी केदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, मल्लिनाथ आण्णाप्पा सुतार, रा बी/१२०२, मॅजेस्टीक इम्पिरिया, फुरसुंगी, पुणे (मूळ रा. मु पो शिंगडगांव वळसंग, ता दक्षिण सोलापुर, जि सोलापुर) व रामचंद्र गुराप्पा सुतार, राठी ओंकार निवास, प्रगती कॉलनी, लेन नं ०७, विश्रामबाग, सांगली) असे फसवणूक करणाऱ्या दोघांची नावे आहेत. याप्रकरणी दोघांवर पोलिसांनी फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी निलेश केदार हे २०१७ पासून मॅजेस्टिक इम्पेरिया सोसायटीत राहत असताना त्यांची ओळख शेजारी राहणारे मल्लीनाथ सुतार यांच्याशी झाली. सुतार याने आपण 'एम.एस. इन्व्हेस्टमेंट अँड फायनान्स सोल्युशन' नावाची कंपनी चालवत असल्याचे सांगून, गुंतवणुकीवर मासिक ३ते ३.५ टक्के परतावा देण्याचे आमिष दाखवले. केदार यांनी पैसे नसल्याचे सांगताच, सुतार याने आपल्या ओळखीने बँकांमधून कर्ज काढून देतो आणि त्याचे हप्ते मीच भरतो, असे सांगून त्यांचा विश्वास संपादन केला.

डिसेंबर २०२१ मध्ये एका महिला एजंटमार्फत सुतार याने केदार यांच्या नावावर एचडीएफसी, आयसीआयसीआय, कोटक महिंद्रा, ॲक्सिस, आदित्य बिर्ला आणि फुलटट्रॉन अशा सहा बँकेकडून व संस्थांकडून एकूण २५ लाख १४ हजार २०९ रुपयांचे कर्ज मंजूर करून घेतले. ही सर्व रक्कम केदार यांनी सुतार याचा मामा रामचंद्र गुराप्पा सुतार (रा. सांगली) याच्या बँक खात्यावर एनईएफटी द्वारे वर्ग केली. सुरुवातीला एप्रिल २०२३ पर्यंत मल्लीनाथ सुतार याने कर्जाचे हप्ते आणि परतावा मिळून दरमहा ७८ हाजार ५०२ रुपये असे एकूण ११ लाख ७७ हजार ८६८ रुपये केदार यांना दिले. मात्र, मे २०२३ पासून त्याने हप्ते भरणे बंद केले. केदार यांनी वारंवार विचारणा केली असता, हिशोब मामाकडे आहे, अशी उडवाउडवीची उत्तरे देऊन नंतर दोन्ही आरोपींनी आपले मोबाईल फोन बंद करून पोबारा केला.

दरम्यान, आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच निलेश केदार यांनी पोलीस ठाण्यात धाव घेतली. पोलिसांनी आरोपी मल्लीनाथ सुतार आणि रामचंद्र सुतार यांच्याविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास फुरसुंगी पोलीस करत आहेत.

# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भारताची गुढी उंचच उंच जात राहो : देवेंद्र फडणवीस

**नागपूर, ता. १९ :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भारताची गुढी उंचच उंच जात राहो,अशा शुभेच्छा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी गुढीपाडवा मराठी नववर्ष दिनाच्या कार्यक्रमात सहभागी होताना दिल्या.

श्री सिद्धिविनायक सेवा ट्रस्ट आणि नववर्ष अभिनंदन समारोह समितीच्या वतीने नागपुरात लक्ष्मीनगर चौकात नववर्षदिनानिमित्त शोभायात्रा आणि रामरक्षा पठण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सुप्रसिद्ध अभिनेत्री सई ताम्हणकर या याप्रसंगी प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या.



तात्या टोपे नगरातील श्री गणेश मंदिरापासून या शोभायात्रेला सुरुवात झाली. त्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अभिनेत्री सई ताम्हणकर, ट्रस्टचे अध्यक्ष आमदार संदीप जोशी आणि इतर मान्यवरांसह महिलांचे ढोलपथक, रामायणातील पात्रांच्या वेशभुषा केलेले कलाकार तसेच मोठ्या संख्येने परिसरातील नागरिक सहभागी झाले होते.

याप्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, प्रत्येक हिंदू आणि मराठी माणसासाठी हा अत्यंत महत्त्वाचा दिवस आहे. आजपासून आपण सारे आपल्या नूतन संकल्पांची सुरुवात करतो आणि आपल्या जीवनाला सामोरे जातो. ही भारताची गुढी असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात ही गुढी उंचच उंच जात राहो, अशा शुभेच्छा मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिल्या. याप्रसंगी सामुहिक रामरक्षा पठण तसेच मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते गुढीचे पूजन करण्यात आले. तत्पूर्वी, अभिनेत्री सई ताम्हणकर यांनी सर्वांना नववर्षाच्या शुभेच्छा दिल्या. अध्यक्ष संदीप जोशी यांनी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.

# अशोक खरातच्या नाशिकमधील फार्महाऊस-मध्ये सापडले पिस्तूल आणि जिवंत काडतूस

**नाशिक, ता. १९ :** तथाकथित अंकशास्त्रज्ञ आणि राजकीय वर्तुळात वावर असलेले कॅप्टन अशोक खरात याला बलात्काराच्या गंभीर आरोपांप्रकरणी अटक करण्यात आल्यानंतर राज्यात मोठी खळबळ उडाली आहे. धार्मिक श्रद्धा, दैवी शक्ती आणि मंत्रतंत्राच्या आडून महिलांचा विश्वास संपादन करून अत्याचार केल्याचा आरोप त्यांच्यावर करण्यात आला आहे.



या प्रकरणाची राज्य सरकारने गंभीर दखल घेत विशेष तपास पथक (SIT) स्थापन केले आहे. या पथकाच्या प्रमुख पदी तेजस्वीनी सातपुते यांची नियुक्ती करण्यात आली असून तपासाची दिशा अधिक व्यापक होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. डखढ स्थापन झाल्यानंतर या प्रकरणातील आणखी धक्कादायक बाबी उघड होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. यापूर्वी नाशिक पोलिसांनी अशोक खरातच्या निवासस्थानी झाडाझडती घेतली होती. त्यानंतर मिरगाव येथील त्याच्या फार्महाऊसवर क्राईम ब्रँचकडून रात्री उशिरा छापा टाकण्यात आला. या कारवाईदरम्यान पोलिसांना महत्त्वाचे दस्तावेज मिळाले असून, मालमत्तेशी संबंधित कागदपत्रे जप्त करण्यात आली आहेत. तसेच या फार्महाऊसमधून एक पिस्तूल आणि काही वापरलेले तसेच न वापरलेले काडतुसेही पोलिसांनी जप्त केल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. या शस्त्रसाठ्याबाबतही पोलिसांकडून स्वतंत्र तपास सुरू आहे.

अशोक खरात हा नाशिक जिल्ह्यातील सिन्नर तालुक्यातील मिरगाव येथील श्री ईशान्येश्वर मंदिर ट्रस्टचा अध्यक्ष आहेत. खरात मर्चंट नेव्हीमधील निवृत्त अधिकारी असून, अंकशास्त्रज्ञ म्हणून त्याची ओळख आहे. २२ वर्षांच्या सेवाकाळात त्याने १५४ देशांचा प्रवास केला असून विविध देशांतील धार्मिक परंपरा, संस्कृती आणि सामाजिक बाबींचा अभ्यास केल्याचा दावा त्याच्या संबंधित संस्थेच्या संकेतस्थळावर करण्यात आला आहे. दरम्यान, अनेक राजकीय नेते, सेलिब्रिटी आणि उद्योजक भविष्य जाणून घेण्यासाठी तसेच विविध उपायांसाठी अशोक खरातच्या संपर्कात असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे या प्रकरणाचे पडसाद राज्याच्या राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात उमटण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.




Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

प्राईम लाईफ



## उन्हाळ्यात सब्जा खाणे का गरजेचे आहे, जाणून घ्या

सब्जा सीड्स ज्याला तुळशीच्या बिया किंवा फालुदा बिया असेही म्हणतात. सब्जा सीड्स पोषक तत्वांनी समृद्ध असून प्रामुख्याने शरीराला थंडावा देण्यासाठी, पचनक्रिया सुधारण्यासाठी आणि वजन कमी करण्यासाठी उत्तम मानले जाते. यात फायबर, ओमेगा- फॅटी ॲसिडस्, आणि अनेक जीवनसत्त्वे असतात. सब्जा खाल्ल्याने शरीराला कोणते आरोग्य फायदे होतात जाणुन घ्या.

शरीराचे तापमान टिकवून ठेवण्यास मदत : सब्जाच्या बियांवर असलेल्या बुळबुळीत जेलसारखे आवरणात पाण्यात भिजवल्यावर त्यांमध्ये नैसर्गिक शीतलता देणारे गुणधर्म येतात. हा बुळबुळीत पदार्थ शरीरातील ओलावा शोषून घेतो आणि त्वचेला आर्द्रता प्रदान करतो. यामुळे शरीरातीत तापमान टिकवून ठेवण्यास मदत होते.

पचनास मदत करते : सब्जाच्या बियांमध्ये डायटरी फायबर असते. ज्यामुळे आतड्यांचे आरोग्य सुधारते, पोट फुगणे कमी होते आणि तीव्र उष्णतेशी संबंधित समस्यांमध्ये देखील सब्जाची मदत होते.

वजन नियंत्रित ठेवण्यस मदत होते : सब्जाच्या बियांमध्ये भरपूर फायबर असल्यामुळे त्या तुमचे वजन नियंत्रित ठेवण्यास मदत करू शकतात. यामुळे पोट जास्त वेळ भरल्यासारखे वाटते.

आम्लपित्त कमी करण्यास मदत होते : सब्जाच्या बियांचा थंड स्वभाव पोटातील आम्ल कमी करण्यास मदत करतो. त्यामुळे उन्हाळ्यात त्या प्रभावी ठरतात. सब्जाचे पाणी पिल्याने शरीरातील आम्लपित्त आणि छातीत जळजळ कमी करण्यास मदत करतात.

रक्तातील साखरेची पातळी सुधारते : सब्जाच्या बिया खाल्याने शरीरात कर्बोदकांचे ग्लुकोजमध्ये होणारे रूपांतर मंदावते. ज्यामुळे रक्तातील साखरेची पातळी स्थिर राहण्यास मदत होते.

त्वचेच्या आरोग्यासाठी मदत करते : सब्जाच्या बियांमध्ये डिटॉक्सिफायिंग गुणधर्म आणि अँटीऑक्सिडंट्स असतात. जे त्वचेच्या पेशी दुरुस्त करण्यास आणि त्वचेला स्वच्छ व चमक देण्यास मदत करतात.

# राजकीय नेत्यांचा ज्योतिषी अशोककुमार खरातला बलात्काराच्या गुन्ह्यात अटक

## ५८ आक्षेपार्ह व्हिडीओ!

**नाशिक, ता. १९ :** मर्चंट नेव्हीतील निवृत्त अधिकारी राजकीय नेत्यांचा बहुचर्चित ज्योतिषी कॅप्टन उर्फ अशोककुमार खरात याला नाशिक पोलिसांनी बलात्काराच्या गुन्ह्यात अटक केली आहे. न्यायालयाने आज त्याला सात दिवसांची पोलीस कोठडी दिली. त्याचे आणखी कारनामे उघड होण्याची शक्यता आहे. सुमारे ५८ आक्षेपार्ह व्हिडीओ हस्तगत करण्यात आले असून, सखोल चौकशी सुरू आहे. राजकीय क्षेत्रातील बड्या हस्तींचे या घटनेमुळे धाबे दणाणले आहे.



विश्वशास्त्राचा अभ्यासक कॅप्टन उर्फ अशोककुमार खरात हा सर्वसामान्यांबरोबरच राजकीय नेत्यांचे भविष्य सांगतो अशी त्याची ख्याती आहे. त्याच्याकडे गेलेल्या एका महिलेला भूलथापा देऊन त्याने आपल्या जाळ्यात ओढले. गुंगीचा पदार्थ देवून तिच्यावर बलात्कार केला, अशी तक्रार पीडित महिलेने सरकारवाडा पोलिसात दिली. गुन्हे शाखेने तपास करून बुधवारी पहाटे खरातला बेडया ठोकल्या.

न्यायालयाने त्याला २४ मार्चपर्यंत सात दिवसांची पोलीस कोठडी दिली आहे. २०२२ पासून डिसेंबर २०२५ पर्यंत त्याने वेळोवेळी अत्याचार केल्याचे महिलेने तक्रारीत म्हटले आहे. संसार उद्धस्त होण्याच्या भीतीने ती तक्रार देत नव्हती. कुटुंबातील व्यक्तीने आधार दिल्यानंतर तिने ही तक्रार दिली. खरातच्या कार्यालय व घर झडतीत पोलिसांना पेनड्राईव्ह मिळाला असून, त्यात आक्षेपार्ह व्हिडीओ आहेत, त्याबाबत सखोल चौकशी सुरू आहे.

राजकीय नेत्यांशी असलेले त्याचे संबंध पाहता हे प्रकरण दडपण्यासाठी दबाव येण्याची शक्यता आहे, असे अंधश्रद्धा निर्मूलन समितीने म्हटले आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करावी, त्याला कठोर शिक्षा करावी, अशी मागणी समितीचे राज्य कार्यवाह कृष्णा चांदगुडे यांनी केली आहे.

सत्ताधारी नेत्यांशी संबंध

### रुपाली चाकणकर यांनी पाय धुतले

राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर या खरात याचे पाय धुवून पाद्यपूजा करीत असल्याचा व त्याच्यावर छत्री धरून उभ्या असल्याचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. चाकणकर या खरात याच्या मिरगाव येथील शिवनिका संस्थानवर ट्रस्टी असल्याची माहिती समोर आली आहे. सामाजिक कामांच्या निमित्ताने ट्रस्टशी जोडले गेले पण कॅप्टन खरात यांचे वैयक्तिक आयुष्य आणि त्यांच्यावर झालेल्या आरोपांबाबत मला कल्पना नाही. पोलीस यात निष्पक्ष चौकशी करतील, अशी एक्स पोस्ट रुपाली चाकणकर यांनी केली.

### एकनाथ शिंदे यांनी केली होती पूजाअर्चा

कॅप्टन खरात याला अनेक राजकीय नेते गुरू मानतात. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना त्यांनी खरात याच्या सिन्नर तालुक्यातील मिरगाव येथील देवस्थान ट्रस्टला भेट देऊन पूजाअर्चा केली होती. तेव्हा त्यांच्या सोबत मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, दीपक केसरकर होते.

# पेरणे फाट्याजवळ सराफा व्यावसायिकाला लुटले; दुचाकी अडवून रोख रोकड केली लंपास

**लोणीकंद, ता. १९ :** दुचाकीवरून आलेल्या अज्ञात तीन इसमांनी भररस्त्यात सराफा व्यावसायिकाला अडवून त्यांच्याकडील रोख रक्कम आणि महत्त्वाची कागदपत्रे असलेली बॅग हिसकावून पळवून नेल्याची घटना नुकतीच घडली. रविवारी (ता. ०८) रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास पेरणे गावातील 'ड्रिम व्हिला' सोसायटी परिसरात ही घटना घडली आहे.



सचिन मनोहर धर्माधिकारी (वय ३६ वर्षे, धंदा-व्यवसाय, रा. डोंगरगाव, ता. हवेली) असे व्यावसायिकाचे नाव आहे. याप्रकरणी त्यांनी दिलेल्या तक्रारीनुसार अज्ञात तिघांच्या विरोधात लोणीकंद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी सचिन धर्माधिकारी यांचे कोरेगाव भिमा येथे सोन्या-चांदीचे दुकान आहे. रविवारी संध्याकाळी नेहम ीप्रमाणे दुकान बंद करून ते आपल्या १७ वर्षीय पुतण्यासह दुचाकीवरून घराकडे निघाले होते. त्यांच्याकडे दिवसभराचा गल्ला आणि दुकानाच्या चाव्या असलेली बॅग होती.

साडेआठ वाजण्याच्या सुम ारास पेरणे गावातील 'ड्रिम व्हिला' सोसायटीच्या पुढे काही अंतरावर गेले असता, पाठीमागून एका काळ्या रंगाच्या स्प्लेंडर मोटारसायकलवरून अज्ञात तीन तरुण आले. चालकाने हेल्मेट घातले होते, तर पाठीमागे बसलेल्या दोघांनी हुडी आणि तोंडावर मास्क लावले होते. त्यांनी धर्माधिकारी यांची गाडी अडवून त्यांना जोराचा धक्का दिला. यामध्ये काका-पुतण्या दोघेही रस्त्यावर पडले.

दोघेही खाली पडल्याची संधी साधून आरोपींनी पुतण्याच्या हातातील हिरव्या रंगाची लेदर बॅग हिसकावून घेतली. या बॅगेत ६० हजार रुपयांची रोख रक्कम आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे ज्वेलरी दुकानाच्या व तिजोरीच्या चाव्या होत्या. लूट केल्यानंतर आरोपींनी पेरणे गावाच्या दिशेने सुसाट वेगाने पळ काढला.

दरम्यान, लोणीकंद पोलिसांनी परिसरात पेट्रोलिंग करून आरोपींचा शोध घेण्याचा प्रयत्न केला, मात्र अंधाराचा फायदा घेऊन आरोपी पसार होण्यात यशस्वी झाले. सचिन धर्माधिकारी यांनी दिलेल्या जबाबानुसार पोलिसांनी अज्ञात तीन आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## हळदीच्या पाकिटात गांजा लपवून विक्री, बाणेर पोलिसांकडून दोघांना अटक

**पिंपरी, ता. १९ :** हळदीच्या पाकिटातून गांजा विक्री करणाऱ्या दोघांना बाणेर पोलिसांनी अटक केली. आरोपींकडून १६ किलो गांजासह परदेशी चलन जप्त करण्यात आले आहे.

या प्रकरणी अभिषेक बोरसे आणि अक्षय बोरसे (दोघे रा. पिंपरी-चिंचवड) यांना अटक करण्यात आली आहे. आरोपी बोरसे हे शहराच्या वेगवेगळ्या भागात गांजा विक्री करत होते. संशय येऊ नये म्हणून ते गांजा हळदीच्या पाकिटात लपवून विक्री करत होते.

गांजा विक्रीबाबत कोणाला संशय येऊ नये म्हणून दोघे जण एका खासगी कंपनीत काम करत होते. बाणेर परिसरात दोघे जण दुचाकीवरुन येणार असून, ते गांजा विक्री करणार असल्याची माहिती बाणेर पोलिसांना मिळाली. त्यानंतर पोलिसांनी सापळा लावून दोघांना पकडले.

पोलिसांनी दोघांची झडती घेतली. त्यांच्याकडे असलेल्या पिशवीत हळदीची पाकिटे सापडली. तपासणीत पाकिटात गांजा लपविल्याचे उघडकीस आले. पोलिसांनी त्यांच्याकडून तीन किलो गांजा जप्त केला. आरोपी बोरसे यांची चौकशी करण्यात आली. तेव्हा दोघांनी पिंपरी-चिंचवडमधील घरात गांजा लपवून ठेवल्याची माहिती मिळाली.

पोलिसांनी घराची झडती घेतली. घरातून पोलिसांनी १३ किलो गांजा जप्त केला. आरोपींनी गांजा कोठून आणला, तसेच ते कोणाला विक्री करणार होते ?, याद्दष्टीने तपास करण्यात येत आहे. पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी अमली पदार्थ तस्करांविरुद्ध कडक कारवाईचे आदेश दिले आहेत.




## सांगोला विद्यामंदिर प्रशालेमध्ये घडलेला पेपर चोरीचा गुन्हा उघड

### शालेय शिक्षण विभागाचे स्पष्टीकरण

**मुंबई, ता. १८ :** सोलापूर जिल्ह्यातील सांगोला विद्यामंदिर प्रशालेतील कस्टडी रुममध्ये ठेवलेले इयत्ता १० वी बोर्ड परीक्षेचे पेपर १७ मार्च २०२६ रोजी अज्ञात इसमाने चोरुन नेल्याबाबत सांगोला पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदरचा गुन्हा एका अल्पवयीन विधि संघर्षग्रस्त बालकाने केल्याचे उघड झाले असल्याचे सांगोला पोलिसांकडून कळविण्यात आल्याची माहिती शालेय शिक्षण विभागामार्फत देण्यात आली आहे.

या अनुषंगाने सांगोला पोलीस ठाण्याकडून करण्यात आलेल्या तपासानुसार हा गुन्हा एका अल्पवयीन विधि संघर्ष ग्रस्त बालकाने केल्याचे उघड झाले आहे. त्याने गुन्हा केल्याबाबत कबुली दिलेली असून गुन्हा करताना वापरलेले इलेक्ट्रिक कटर, इलेक्ट्रिक मोटार सायकल, चोरीस गेलेले इयत्ता १० वी बोर्ड परीक्षेच्या प्रश्न पत्रिका व तीन कोऱ्या उत्तर पत्रिका जप्त करण्यात आल्या असल्याची माहिती सांगोला पोलीसांकडून देण्यात आल्याचे शालेय शिक्षण विभागामार्फत कळविण्यात आले आहे.

## महिला आयोगाच्या अध्यक्षांनी राजीनामा द्यावा; खासदार संजय राऊतांची मागणी

**नाशिक, ता. १९ :** नाशिकमधील स्वयंघोषित ज्योतिषी अशोक खरात उर्फ कॅप्टन याला बलात्कार आणि भोंदूगिरी प्रकरणी अटक झाल्यानंतर राज्याच्या महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्या अडचणी वाढल्या आहेत. चाकणकर यांनी याच अशोक खरातचे पाद्यपूजन केल्याचे फोटो आणि व्हिडिओ समोर आल्याने विरोधकांकडून त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली जात आहे.



याप्रकरणी उद्धव ठाकरे शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांनी महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्यावर निशाणा साधला आहे. रूपाली चाकणकर यांनी नैतिकतेच्या आधारावर राजीनामा देण्याची मागणी संजय राऊत यांनी केली. पत्रकार परिषदेत संजय राऊत यांनी मुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याप्रकरणात लक्ष घालण्याची मागणीही केली आहे.

रुपाली चाकणकर या मूर्ख आहेत. त्या खोटं बोलत आहेत. त्यांनी महिला आयोगाच्या अध्यक्षपदी राहूच नये. त्यांच्यात थोडी जरी नैतिकता असेल तर त्यांनी पद सोडले पाहिजे. प्रकरणात वैयक्तिक आयुष्याचा प्रश्न येता कुठे? एका महिलेने हा सर्व प्रकार सहन न झाल्याने तक्रार दिली. तर चाकणकर यांनी तक्रार दाखल न करण्यासाठी अनेकांवर दबाव आणला, असाही आरोप संजय राऊतांनी केला.

रुपाली चाकणकर यांच्यावर अनेक आरोप करण्यात आले आहेत. त्यांना कोण आणि का वाचवतंय हा प्रश्न मला पडला आहे. त्या नाशिकच्या भोंदूबाबाने अनेक महिलांवर अत्याचार केले. महिला आयोगाच्या अध्यक्ष या भोंदूबाबाचे पाद्यपूजन करतात आणि गृहमंत्री डोळे बंद करत बसले आहेत, अशी टीकाही राऊतांनी केली.

शासनातील मोठ्या पदावरील व्यक्ती मग त्यात महिला आयोगाच्या अध्यक्षा असू देत अथवा मंत्री, आमदार हे सगळे अंधश्रद्धेने त्या बाबाची पूजा करतात. कोणी जादूटोण्याला तिथं बसलं आहे. त्यांच्यासोबत ज्यांची ज्यांची छायाचित्र आले आहेत. त्यांच्यावर देवेंद्र फडणवीस यांनी अंधश्रद्धा निर्मूलन कायद्याप्रमाणे गुन्हे दाखल केले पाहिजे, अशी मागणी संजय राऊत यांनी केली आहे.

## हडपसरमध्ये कबुतर चोरीच्या संशयावरून १९ वर्षीय तरुणाची हत्या

### पाच जणांवर गुन्हा दाखल

**हडपसर, ता. १९ :** हडपसर परिसरात कबुतर चोरीच्या संशयावरून एका १९ वर्षीय तरुणाला बेदम मारहाण करण्यात आली, ज्यामध्ये त्याचा मृत्यू झाला. याप्रकरणी पाच जणांविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




रुपेश धनराज शिंदे (वय १९, रा. बोराटे वस्ती, मोशी) असे खून झालेल्या तरुणाचे नाव असून, या घटनेमुळे पिंपरी-चिंचवड आणि पुणे शहरात मोठी खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रुपेश शिंदे आणि त्याचा मित्र अजय टिंगरे हे मंगळवारी मध्यरात्री अडीचच्या सुमारास हडपसर परिसरातून दुचाकीवरून निघाले होते. हडपसरमधील शंकर मठ परिसरातील एका कबुतराच्या ढाबळीजवळ ते काही वेळ थांबले होते. यावेळी तेथील पाळीव कुत्रे भुंकू लागल्याने परिसरात राहणाऱ्या पाच जणांना जाग आली.

चोर आल्याच्या संशयावरून या पाच जणांनी रुपेश आणि अजय यांना हटकले. घाबरलेले दोघेही तरुण तेथून पळू लागले, मात्र टोळक्याने त्यांचा पाठलाग सुरू केला. पळत असताना रुपेशचा पाय घसरला आणि तो रस्त्यावर पडला. यावेळी आरोपींनी त्याला घेरले आणि क्रिकेटच्या बॅटने तसेच लाथाबुक्क्यांनी अमानुष मारहाण केली. या हल्ल्यात रुपेशच्या डोक्याला आणि शरीराला गंभीर दुखापत झाली.

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन जखमी रुपेशला तातडीने रुग्णालयात दाखल केले. मात्र, जखमा गंभीर असल्याने उपचारादरम्यान त्याची प्राणज्योत मालवली. आपल्या तरुण मुलाचा अशा प्रकारे अंत झाल्याने वडील धनराज शिंदे यांनी वानवडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. वानवडी पोलिसांनी याप्रकरणी पाच जणांविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल केला आहे.

## रजा संस्थेशी संबंधित प्रकरणाची एटीएस चौकशी सुरू; फडणवीस यांची विधानपरिषदेत माहिती

**मुंबई, ता. १९ :** गुलजार ए रजा या संस्थेशी संबंधित आर्थिक व्यवहारांबाबत गंभीर बाबी समोर आल्याने या प्रकरणाची एटीएसमार्फत चौकशी सुरू करण्यात आल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेत दिली. विक्रम काळे यांनी विचारलेल्या प्रश्नी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, या प्रकरणाची मर्यादा केवळ धार्मिक कारणासाठी निधी जमा करण्यात आला एवढ्यावरच नसून तपासादरम्यान परदेशातील संस्थेकडून सुमारे २५ लाखांची रक्कम जमा झाल्याचे समोर आले आहे.



या पार्श्वभूमीवर संबंधित संस्थेची सर्व बँक खाती सील करण्यात आली असून आर्थिक व्यवहारांची सखोल तपासणी सुरू आहे. गेल्या चार वर्षांत सुमारे १८ हजार ५७३ देणगीदारांकडून चार जिल्ह्यांतील ४०० ड्रॉप बॉक्सद्वारे निधी जमा करण्यात आला असून सर्व देणगीदारांची माहिती उपलब्ध नसल्याने त्याची सखोल पडताळणी सुरू आहे.

विविध खात्यांमधून रक्कम काढून इतरत्र वळवण्यात आल्याची शक्यता तपासली जात आहे. निधीचा वापर कोणत्या कारणांसाठी करण्यात आला, तसेच त्यामागील उद्देश काय होता, याची चौकशी केली जात आहे.

या प्रकरणातील प्रत्येक पैलू स्पष्ट करण्यासाठी एटीएसकडून समांतर तपास सुरू असून, आवश्यकतेनुसार पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. यावर अधिक माहिती देताना राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर म्हणाले, संबंधित संस्थेच्या नावाखाली विविध कारणे सांगून नागरिकांकडून सुमारे ४. ७३ कोटींची रक्कम जमा करण्यात आली.

ट्रस्ट माजलगाव येथे स्थापन करण्यात आला असला तरी बँक खाते लातूर येथील क्सिस बँकेत उघडण्यात आले होते. या प्रकरणात आतापर्यंत दोन आरोपींना अटक करण्यात आली असून आणखी दोघांचा शोध सुरू आहे, असेही ते म्हणाले.

# सीडीएससीओचा देशभर औषधांसाठी एकसमान परवाना नियम लागू

**नवी दिल्ली, ता. १९ :** देशभरात औषध निर्मिती प्रक्रियेत पारदर्शकता आणि गुणवत्ता वाढवण्यासाठी महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. केंद्रीय औषध मानक नियंत्रण संघटना (सीडीएससीओ)ने आता औषध उत्पादनासाठी डोजियर आधारित परवाना प्रणाली लागू करण्याचे निर्देश दिले आहेत. या नव्या नियम ानुसार, औषध तयार करणाऱ्या कंपन्यांना परवाना मिळवण्यासाठी एकाच वेळी संपूर्ण माहिती सादर करावी लागणार आहे.

या डोजियरमध्ये औषधाची गुणवत्ता, सुरक्षितता, प्रभाव, चाचणी अहवाल आणि उत्पादन प्रक्रियेची सविस्तर माहिती असणे आवश्यक आहे. ही सर्व कागदपत्रे तपासल्यानंतरच स्थानिक औषध नियंत्रण विभाग संबंधित कंपनीला परवाना देण्याचा निर्णय घेईल. यामुळे औषध निर्मिती प्रक्रिया अधिक काटेकोर आणि विश्वासार्ह होण्याची अपेक्षा आहे. आतापर्यंत देशातील वेगवेगळ्या राज्यांमध्ये औषध परवाना देण्याचे नियम वेगवेगळे होते. त्यामुळे औषधांच्या गुणवत्तेबाबत अनेकदा प्रश्न निर्माण होत होते. काही वेळा निकृष्ट दर्जाच्या औषधांमुळे गंभीर परिणामही झाले आहेत. उदाहरणार्थ, गेल्या वर्षी एका राज्यात कफ सिरपमुळे लहान मुलांच्या मृत्यूची घटना समोर आली होती. या प्रकरणात नियमांचे उल्लंघन करून परवाना दिल्याचेही उघड झाले होते. अशा घटनांमुळे संपूर्ण प्रणालीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. या पार्श्वभूमीवर सीडीएससीओने सर्व राज्यांना एकसमान आणि कठोर नियम लागू करण्याचे निर्देश दिले आहेत. उत्तर प्रदेशसह अनेक राज्यांच्या औषध नियंत्रण विभागांना या नव्या प्रणालीबाबत मार्गदर्शन करणारे दस्तऐवजही देण्यात आले आहेत. त्यामुळे परवाना प्रक्रिया अधिक स्पष्ट आणि व्यवस्थित होईल, तसेच कंपन्यांची जबाबदारीही निश्चित केली जाईल.



या नव्या प्रणालीचा एक मोठा फायदा म्हणजे औषधांची गुणवत्ता सुधारण्यास मदत होईल. कंपन्यांना प्रत्येक टप्प्यावर माहिती सादर करावी लागणार असल्याने चुकीची किंवा अपुरी माहिती देण्याची शक्यता कमी होईल. यामुळे रुग्णांना सुरक्षित आणि प्रभावी औषधे मिळण्यास मदत होईल. तथापि, हा नियम सर्व प्रकारच्या उत्पादनांसाठी लागू होणार नाही. आयुष औषधे, सौंदर्यप्रसाधने आणि वैद्यकीय उपकरणे यांना या प्रणालीतून वगळण्यात आले आहे. म्हणजेच, हा नियम मुख्यतः अलोपॅथी औषध निर्मिती करणाऱ्या कंपन्यांवर लागू होईल. एकंदरीत, या निर्णयामुळे देशातील औषध उद्योगात मोठा बदल होण्याची शक्यता आहे. परवाना प्रक्रिया अधिक कडक, पारदर्शक आणि जबाबदार बनणार असल्याने निकृष्ट औषधांवर नियंत्रण मिळवणे शक्य होईल. तसेच, रुग्णांच्या आरोग्याच्या दृष्टीने हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे.